# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.०१** — **विषय क्रमांक - ०१**

दिनांक : १५/०१/२०२४ — विभाग : नगररचना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ०१ दिनांक १५/०१/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत विशेष सहाय्य योजने अंतर्गत नगररचना योजना राबविणे बाबत.... |
| ठराव क्रमांक - ०१ दिनांक १५/०१/२०२४ | केंद्र शासनाने दि.06/04/2022 रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यांना भांडवली गुंतवणुकीकरिता विशेष सहाय्य योजनेंतर्गत मंजूर केलेले बिनव्याजी कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्य राज्य शासनास प्राप्त झाले असून, त्याचे वितरणाबाबतची कार्यपध्दती शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.सिआयडी-3322/ प्र.क्र.93/नवि-10,दि.07.10.2022, दि.17.10.2022 व प्र.क्र.197/नवि-10, दि.28.03.2023 अन्वये निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी भौगोलिक माहिती प्रणाली आधारित नगर रचना योजना तयार करणेकरिता केंद्र शासनाकडून या योजनेंतर्गत 50 वर्षांसाठी मिळणा-या बिनव्याजी कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्य मागणीबाबत शासनाच्या नगर रचना संचालनालयाकडे सादर करावयाचा प्रस्ताव सभेच्या मान्यतेस्तव सादर केलेला आहे.<br><br>सुधारीत मंजूर विकास योजना अहमदनगर महानगरपालिका नुसार |

| अ. क्र. | नगर रचना योजना प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचे नाव | गट नं. / स. नं./ सि. स. नं. | अंदाजित क्षेत्र | विकास योजनेनुसार जमीन वापर | जागा मालकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मौजे नालेगाव | गट नं. 175 ते 178, 181 ते 184, 188, 189 व 197 (एकुण 12) | 70.00 हेक्टर | शेती विभाग | अंदाजे 820 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | मौजे नालेगाव | गट नं.180, 185 ते 187, 200 ते 202, 205, 209 ते 214, 222, 223, 226, 227, 228, 232 ते 235 (एकुण 23) | 71.38 हेक्टर | भागशः शेती विभाग भागशः रहिवास विभाग | अंदाजे 780 |
| 3 | मौजे बोल्हेगाव | गट नं.22, 23, 52 ते 56 व 71 (एकुण 08) | 40.00 हेक्टर | शेती विभाग | अंदाजे 150 |
| 4 | मौजे बोल्हेगाव | गट नं.35 ते 42 व 51 (एकुण 09) | 60.00 हेक्टर | शेती विभाग | अंदाजे 160 |

उपरोक्त प्रमाणे नमुद ठिकाणी नगर रचना योजना राबविणे बाबत शहरातील मा.लोकप्रतिनिधी मार्फत हरकत प्राप्त झाल्या असुन नागरिकांच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सदर योजना राबविण्यांत येवू नये असे म्हणणे आहे. अहमदनगर महानगरपालिका हद्दीत यापुर्वी नगररचना योजना राबविण्यांत आलेल्या आहेत. तसेच महानगरपालिकेच्या हद्दीसाठी सुधारीत विकास योजना तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर बाबत नव्याने तयार होणा-या विकास योजनेत भविष्यात शहराचा विकासाचा कल विचारात घेवून आवश्यक ते नियोजन करता येईल.

तरी वरिलप्रमाणे नमुद बाबी जसे की, मा.लोकप्रतिनिधी मार्फत प्राप्त हरकती, भविष्यात नव्याने होणारी विकास योजना इत्यादी बाबी विचारात घेता प्रशासक सर्व साधारण सभा सदरचा प्रस्ताव सद्यस्थितीत स्थगित ठेवण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे) | (डॉ.पंकज जावळे) |
| नगरसचिव | प्रशासक |
| अहमदनगर महानगरपालिका. | अहमदनगर महानगरपालिका. |
| अहमदनगर ४१४००१. | अहमदनगर ४१४००१. |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.०२** **विषय क्रमांक - ०२**

दिनांक : १५/०१/२०२४ विभाग : नगररचना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ०२<br>दिनांक<br>१५/०१/२०२४ | नालेगांव स.नं.२२० मधील खुली जागा सकल मराठा समाज, अहमदनगर या सामाजिक संस्थेस समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी व अरुणोदय गोशाळेस देणेबाबत महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाहीसाठी मा.महासभेकडे पाठविणे बाबत.. |
| विषय क्रमांक - ०२<br>दिनांक<br>१५/०१/२०२४ | अहमदनगर शहराची 2 री सुधारीत विकास योजना शासनाने निर्णय क्र. टीपीएस-1611/89250 ( A) 2011 युडी-9 दिनांक 4 एप्रिल 2012 रोजी मंजुर केलेली असुन वगळलेल्या भागाची विकास योजना दिनांक 4 जुलै 2016 रोजी मंजुर करण्यात आलेली आहे.<br>नालेगाव स.नं 220 या आरक्षण क्र 295 या जमिनीपैकी महानगरपालिकेच्या मालकीची जागा मराठा समाजासाठी बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणेकामी या वापरासाठी विकसित करणेस तसेच अरुणोद्यय प्रतिष्ठाण यांना गोशाळेसाठी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला होता. त्या अनुषंगाने मा. महासभेने संदर्भ क्र 1 नुसार प्रस्ताव क्र 08 दिनांक 11/06/2021 अन्वये जागा देणेबाबतचा व तसेच कलम 37 ची वैधानिक कार्यवाही करणेबाबतचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे.<br>मौजे नालेगाव स.न 220 ही जमिन एकुण क्षेत्र 9.14 हेक्टर ( 22.85 एकर ) एवढ्या क्षेत्राची असुन ही जमिन तत्कालीन नगरपरीषदेने खरेदी केलेली असुन फेरफार क्र 10913 ने 7/12 उता-यावर एकुण 2 हेक्टर 48 आर क्षेत्रास अहमदनगर महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली असुन सदर जमिन सन 1999 साली महानगरपालिका हद्दीत सामील झालेली आहे. सिनानदीच्या पश्चिमेकडे नगर-निंबळक रोड या 15.00 मी. रुंद विकास योजना रस्याच्या दोन्ही बाजुला ही जमिन आहे. एकुण 22.85 एकर क्षेत्र पै काही क्षेत्रावर विविध प्रकारचे आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत<br>अहमदनगर शहराच्या उक्त नमुद मौजे नालेगाव स.नं 220, पै मधील जमिनीमध्ये मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र 295 मधील MUNICIPAL PURPOSE हे आरक्षण दर्शविलेले असुन सदर आरक्षणचे नामानिधान बदलुन अनुक्रमे सांस्कृतिक केंद्र व विद्यार्थी वसतीगृह व गोवंश संवर्धन साठी असे करणेसाठी मा. महासभेच्या सुचनेनुसार कलम 37 ची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.. |

| | |
|---|---|
| | विषयांकित नालेगाव स.नं 220, 221 ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. त्यानुसार मंजुर विकास योजनेतील विकास आराखड्यावरील आरक्षण क्र 297 MUNICIPAL PURPOSE हे नामानिधान बदलणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम 1966 चे कलम 37 ची कार्यवाही सुरु असुन दिनांक 7 जुलै 2022 च्या शासन राजपत्रात तसेच स्थानिक वर्तमान पत्रात सदर आरक्षणाचे फेरबदला बाबत नागरीकांच्या सुचना व हरकती मागविणेकामी प्रसिध्दी देण्यात आलेली होती.<br>उक्त नियोजित फेरबदल दर्शविणा-या कलम 37 च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक 7 जुलै 2022 रोजी प्रसिध्द केलेल्या दिनांकापसुन 30 दिवसांच्या आत नागरीकांच्या सुचना/हरकती लेखी स्वरुपात मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु विहित मुदतीत याबाबत एकही हरकत/सुचना अर्ज इकडेस प्राप्त झालेले नसलेने अहमदनगर शहराच्या उक्त नमुद मौजे नालेगाव स.नं 220,221 पै मधील जमिनीमध्ये मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र .297 व आरक्षण क्र 295 मधील MUNICIPAL PURPOSE हे आरक्षण दर्शविलेले असुन सदर आरक्षणचे नामाधिधान बदलुन अनुक्रमे सांस्कृतिक केंद्र व विद्यार्थी वसतीगृह् व गोवंश संवर्धन साठी असे करणेसाठी नागरीकांच्या हरकती व सुचना प्राप्त झाले नसलेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही साठी मा शासनाकडे अंतिम मंजुरी साठी पाठविणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव प्रस्ताव सादर करण्यांस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेंत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
(डॉ.पंकज जावळे)
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.०३** **विषय क्रमांक - ०३**

दिनांक : १५/०१/२०२४ विभाग : नगररचना विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - ०३ दिनांक १५/०१/२०२४ | केंद्र शासनाच्या सन 2022-2023 मधील भांडवली गुंतवणी करीता राज्यांना विशेष सहाय्य योजने अंतर्गत राज्य शासनास प्राप्त अर्थसहाय्या मधुन अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर बिनव्याजी कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्य मिळणेकरीता सादर करावयाच्या प्रस्तावास मंजुरी मिळणे बाबत... |
| ठराव क्रमांक - ०३ दिनांक १५/०१/२०२४ | वरिल विषयांकीत केंद्र शासनाने दि.०६/०४/२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यांना भांडवली गुंतवणुकीकरिता विशेष सहाय्य योजनेंतर्गत मंजूर केलेले बिनव्याजी कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्य राज्य शासनास प्राप्त झाले असून, त्याचे वितरणाबाबतची कार्यपध्दती शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.सिआयडी-३३२२/प्र.क्र.९३/नवि-१०, दि.०७.१०.२०२२, दि.१७.१०.२०२२ व प्र.क्र.१९७/नवि-१०, दि.२८.०३.२०२३ अन्वये निश्चित करण्यात आली आहे .त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर प्रशासनाकडून या योजनेंतर्गत ५० वर्षांसाठी मिळणा-या बिनव्याजी कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्य मागणीबाबत शासनाच्या नगर रचना संचालनालयाकडे सादर करावयाचा, पुढील तपशीलातील प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केलेला आहे.<br>मंजूर विकास योजना अहमदनगर महानगरपालिका विकास योजना नुसार न र.यो क्र. ४ येथील अं.भू.क्र.९६ या जमिनीवरील दर्शविलेले लहान मुलाचे खेळाचे मैदान हे उक्त योजनेंतर्गत प्राप्त होणा-या अर्थसहाय्यातून विकसित करावयाची आहे.<br>उक्त योजनेंतर्गत प्राप्त होणारे अर्थसहाय्य ५० वर्षांकरिता बिनव्याजी कर्ज स्वरुपात असून, सदर अर्थसहाय्य कार्यान्वयन अंमलबजावणी संस्थांना वितरीत करण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयात नमूद असल्याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे .त्याचप्रमाणे प्रस्तावासाठी प्राप्त होणारे अर्थसहाय्य तसेच अशा प्राप्त होणा-या अर्थसहाय्यातून विकसित होणा-या सुविधेपासून प्राप्त होणारे उत्पन्न आयुक्त व सहाय्यक संचालक, नगर रचना अहमदनगर यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त खाते उघडून अशा संयुक्त बँक खात्यावर जमा करणे, Annual sinking Fund निर्माण करणे इ .तसेच खर्चाचे देयक उक्त दोन अधिका-यांच्या स्वाक्षरीने पारीत करणे आवश्यक आहे . |

| | |
|---|---|
| | वरील तपशीलानुसार या योजनेंतर्गत लहान मुलाचे खेळाचे मैदान या आरक्षणाचे विकसनासाठी उपलब्ध होणा-या अर्थसहाय्यामधून करावयाच्या विकासासंदर्भात किमान बांधकाम क्षेत्र, या प्रकल्पासाठीच्या किमान आवश्यक बाबी, त्याचे मापदंड इ .ठरवून त्याबाबत संबंधित घटकांना माहिती देणे, सदर प्रकल्पाकरिता अर्थसहाय्य मागणीचा प्रस्ताव सादर करणे, प्राप्त अर्थसहाय्याच्या खर्चाबाबत संबंधित शासन निर्णयातील अथवा विधीवत तसेच प्रचलित कार्यपध्दती अवलंबणे, प्राप्त अर्थसहाय्याच्या खर्चाबाबत विहीत कालावधीत विनियोग प्रमाणपत्र सादर करणे, प्राप्त अर्थसहाय्य व खर्चाचे लेखे अद्ययावत ठेवणे, प्रकल्पाच्या भौतिक व आर्थिक प्रगतीबाबत सर्व संबंधितांना अपेक्षिल्यानुसार तात्काळ अहवाल सादर करणे इ .कार्यवाहीकरिता मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेसाठी मा.प्रशासक सर्व साधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>उपरोक्त योजनेंतर्गत ५० वर्षांचे कालावधीसाठी प्राप्त होणा-या बिनव्याजी कर्ज स्वरुपातील अर्थसहाय्याची परतफेड करावयाची आहे .तसेच सदर आरक्षण विकसित केल्यानंतर त्याचे कार्यान्वयन होणेसाठी प्रशासकीयदृष्ट्या आवश्यक असणारे मनुष्यबळ व इमारतीच्या दुरुस्ती /देखभालीकरिता खर्चास मा.प्रशासक **सर्वसाधारण सभा** मंजूरी देत आहे.<br>या योजने अंतर्गत घेतलेल्या प्रस्तावांच्या कार्यान्वयतेबाबत व प्रगतीबाबत मा.आयुक्त यांनी सर्व साधारण सभेस, नियमित सभादरम्यान अवगत करावे. तसेच यामध्ये शासनातर्फे काही बदल करावयाचे झाल्यास त्यास प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी राहील. सदर प्रकरणात सर्व वैधानिक कार्यवाही करणेचे व शासनास फेरबदल करणेचे प्रस्ताव सादर करणेचे मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांना याव्दारे अधिकार प्रदान करण्यास मा.प्रशासक **सर्वसाधारण सभा** मंजूरी देत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
(मेहेर लहारे)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(डॉ.पंकज जावळे)
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.